**दिन विशेष...**
१८५३ : भारतातील पहिली रेल्वेगाडी मुंबई ते ठाणे या लोहमार्गावर धावण्यास सुरुवात झाली.
१८८९ : प्रसिध्द विनोदी अभिनेते चार्ली चप्लिनचा जन्म
१९७५ : भारताचे माजी राष्ट्रपती डा. राधाकृष्णन यांचे निधन.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ७८,१११.२४ +१,२६३.६७ (+१.६४%)
डॉलर ₹ ९३.४४

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४१ | २७ |
| दिल्ली | ३८ | २५ |
| मुंबई | ३१ | २६ |
| नागपूर | ४२ | २८ |
| पुणे | ३८ | २१ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १५५ किंमत : ५ रु. | पाने ४

**सुविचार**
आपल्या जीवनातील प्रत्येक आनंदाची किंमत समजून घ्या. तुम्हाला मिळालेल्या सुखांचा आनंद लुटा आणि त्याची कदर करा.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:०९ संध्या-६:४६

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५३,८९०/- २,५५,०००/-

# संशोधन, जिज्ञासा, निरंतर शिकण्याची वृत्ती आत्मसात करा : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

## केंद्रीय आयुर्विज्ञान संस्थेच्या (एम्स) व्दितीय दीक्षांत समारंभात मांडले विचार

वृत्तसंस्था । नागपूर

**वैद्यकीय क्षेत्रात सेवाभावाबरोबरच आयुष्यभर शिकत राहण्याची वृत्ती जपायला हवी. वैद्यकीय क्षेत्रात नैतिक मूल्यांचे स्थान सर्वतोपरी आहे. जिज्ञासा, संशोधन आणि सतत शिकत राहण्याची वृत्ती आत्मसात करा.**

तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी ते करुणा, प्रामाणिकपणा आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोनाची जागा घेऊ शकत नाही. वैद्यकीय क्षेत्रात यशासह करुणेचा भाव जपल्यास तुम्ही एक उत्तम व्यक्तीही होऊ शकाल, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज येथे केले.

केंद्रीय आयुर्विज्ञान संस्थेचा (एम्स) द्वितीय दीक्षान्त समारंभ आज संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपले हे विचार मांडले.



### एम्स अन् आरोग्य विद्यापीठात व्यापक सहकार्य हवे : राज्यपाल

मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि कर्करोगासारख्या जीवनशैलीशी निगडित आजारांमध्ये सध्या मोठी वाढ होत आहे. नैराश्य, चिंता आणि व्यसनाधीनतेसारख्या मानसिक आजारांच्या समस्यांकडेही गांभीर्याने लक्ष पुरविण्याची गरज निर्माण झाली असून आयुष्यमान भारत सारख्या योजनांमुळे लोक दर्जेदार आरोग्य सेवांचा लाभ घेण्यासाठी शासकीय रुग्णालयांकडे वळत आहेत, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी यावेळी बोलताना केले.

या समारंभात राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, नागपूर एम्सचे अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे, कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपस्थित वैद्यकीय विद्यार्थ्यांना संबोधित करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, वैद्यकीय क्षेत्र हा केवळ एक व्यवसाय नसून संवेदनशीलतेने मानवतेची सेवा करण्याचा एक मार्गही आहे. एक वैद्यकीय चिकित्सक केवळ आजारांवर उपचार करत नाही, तर तो आजाराने ग्रासलेल्या व्यक्तीच्या मनात आशेचा संचारही निर्माण करतो. चिकित्सकाचा सहानुभूतीचा सल्ला केवळ आजारी व्यक्तीलाच नव्हे तर त्याच्या कुटुंबीयांनाही आधार देतो. अनेकदा डॉक्टरांसमोर कठीण परिस्थिती निर्माण होते. मात्र, अशा परिस्थितीतही रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदनशील राहणे आवश्यक आहे. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी देखील आरोग्य कर्मचाऱ्यांशी नेहमी (पान २ वर)

### पाच किमीच्या परिघात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करणार : मुख्यमंत्री

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले की, महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात १५ हून अधिक वैद्यकीय महाविद्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे. आरोग्य सुविधा शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. संसर्गजन्य आजारांवर मात करण्यासाठी व्यापक नियोजनाची आवश्यकता आहे. पाच किलोमीटरच्या परिघात सर्व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे अद्ययावतीकरण करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात

### शेन वॉर्नचा मृत्यू कोविड लसीमुळे

**मेलबोर्न ।** ऑस्ट्रेलियाचा महान फिरकी गोलंदाज शेन वॉर्न याचं २०२२ मध्ये थायलंडमध्ये निधन झालं. क्रिकेट विश्वाला धक्का देणाऱ्या या दुःखद घटनेला चार वर्षे उलटली आहेत. यानंतर आता त्याच्या मुलाने त्यांच्या मृत्यूच्या कारणाबद्दल एक मोठं वक्तव्य केलं असून त्यामुळे मोठा गौप्यस्फोट झाला आहे. वयाच्या ५२व्या शेन वॉर्नने जगाचा निरोप घेतला. त्याचा मुलगा जॅक्सनने दावा केला आहे की, त्याच्या वडिलांचा मृत्यू कोविड-१९ लसीमुळे झाला.

### राज्यात नव्याने १० वैद्यकीय महाविद्यालयांना मान्यता

**सांगली ।** राज्यात सध्या ३६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये कार्यरत असून नव्याने १० महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली आहे. यामुळे सुमारे एक हजार एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. जपानच्या जायकाफ बँकेकडून सुमारे चार हजार कोटी रुपयांचे कर्ज मिळणार असून त्यातून नवीन महाविद्यालये व नर्सिंग शिक्षणाचा विस्तार होणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

### एलपीजी पुरवठ्याबाबत सरकारची चिंता वाढवणारी
# देशात पुढील ४ वर्षे गॅस टंचाई?

प्रतिनिधी । दिल्ली

**मध्यपूर्वेतील संघर्षामुळे भारतासह जगावर इंधन आणि गॅस तुटवड्याचे संकट उभे असताना एलपीजी पुरवठ्याबाबत टेन्शन वाढवणारी अपडेट समोर आली आहे. एलपीजी गॅस पुरवठ्याचा तुटवडा पुढील तीन ते चार वर्षे भासू शकतो, अशी भीती सरकारी अधिकाऱ्याने व्यक्त केली आहे.**

उत्पादन प्रकल्पांना किती प्रमाणात नुकसान झाले आहे याबाबत स्पष्टता नसल्याने पुरवठा विस्कळीत राहण्याची शक्यता तात्पुरती आहे की दीर्घकालिन हे




सांगता येत नाही, असे एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने स्पष्ट केले आहे. दरम्यान, भारत एलपीजी पुरवठ्यासाठी मोठ्या प्रमाणात पश्चिम आशियावर अवलंबून आहे. दुरस्तीसाठी तीन वर्षांपेक्षा अधिक वेळ लागण्याची शक्यता आहे.

भारतात मोठ्या प्रमाणात एलपीजी गॅस पुरवठा पश्चिम आशियातून होतो. पण, सध्या या भागात संघर्ष सुरु असल्यामुळे समुद्री वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे. तसेच, अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनीत नाकेबंदी केल्याने पुरवठ्यावर आणखी परिणाम झाला आहे. अमेरिका आणि इस्रायलने हल्ले केल्यानंतर इराणने प्रत्युत्तरात विविध उर्जा प्रकल्पांवर हल्ले केले आहेत. यात उत्पादन प्रकल्पांना मोठे नुकसान झाले आहे. पुरवठादारांनी दिलेल्या माहितीनुसार, दुरुस्तीसाठी कदाचित तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वेळ लागण्याची शक्यता आहे, असे वृत्त मनीकंट्रोल या संकेतस्थळाने सूत्रांच्या हवाल्याने प्रसिद्ध केली आहे.

# युद्ध थांबवण्यासाठी शी जिनपिंग यांनी सादर केला ४ कलमी शांतता प्रस्ताव

वृत्तसंस्था । बीजिंग

**मध्य पूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी प्रादेशिक शांततेसाठी चार-कलमी शांतता प्रस्ताव सादर केला आहे.चीनच्या राष्ट्राध्यक्षांनी मंगळवारी अबू धाबीचे युवराज शेख खालिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्यासोबत झालेल्या भेटीदरम्यान हा प्रस्ताव मांडला.अमेरिका आणि इराण यांच्यातील पाकिस्तानमध्ये झालेली चर्चा अयशस्वी झाली असताना आणि शस्त्रसंधी संपण्यापूर्वी संवादाच्या नवीन शक्यता शोधल्या जात असताना चीनचा हा प्रस्ताव आला आहे.**



मध्य पूर्व आणि आखाती देशांमध्ये शांततापूर्ण सहअस्तित्वाचे तत्त्व, प्रादेशिक देशांशी संबंध सुधारण्याचे आणि एक शाश्वत सुरक्षा चौकट स्थापित करण्याचे आवाहन, राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा आदर करण्यावर आणि त्याचे कधीही उल्लंघन न करण्यावर भर, संयुक्त राष्ट्रांना केंद्रस्थानी ठेवून आंतरराष्ट्रीय प्रणाली मजबूत करणे, विकास आणि सुरक्षेवर भर हे शी जिनपिंग यांच्या चार-कलमी योजनेतील मुद्दे आहेत.

अमेरिकेने इराणच्या बंदरांवर घातलेली नाकेबंदी धोकादायक असल्याचे चीनने म्हटले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या बंदरांमध्ये येणारी-जाणारी जहाजे बुडवण्याची धमकी दिली आहे. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली असून, केवळ चीनसारख्या मित्र देशांच्या जहाजांनाच त्यातून जाण्याची परवानगी दिली आहे.

दरम्यान, चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी ट्रम्प यांची ५० टक्के शुल्कवाढीची धमकी पूर्णपणे निराधार असल्याचे म्हटले आहे आणि अमेरिकेने अधिक शुल्क आकारल्यास चीन जोरदार प्रत्युत्तर देईल, असा इशारा दिला आहे. ट्रम्प पुढील महिन्यात बीजिंगला भेट देणार आहेत.

जिनपिंग यांचे प्रथमच भाष्य

जगाला पुन्हा जंगलच्या कायद्यात (अराजकतेत) जाण्यापासून रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या नियमांचे अधिकार कायम राखले पाहिजेत असे जिनपिंग यांनी म्हटले असून विकास आणि सुरक्षा यांच्यात संतुलन असले पाहिजे. पश्चिम आशिया आणि आखाती प्रदेशातील देशांच्या विकासाला चालना देण्यासाठी सर्व पक्षांनी अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी काम केले पाहिजे असे त्यांनी नमूद केले. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षावर शी जिनपिंग यांनी भाष्य करण्याची ही पहिलीच वेळ आहे. या संघर्षाचा परिणाम संयुक्त अरब अमिरातीसह अनेक आखाती देशांवरही झाला आहे. चीनचे इराणसोबत घनिष्ठ सामरिक संबंध आहेत. चीनने अमेरिकेच्या (पान २ वर)

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेतील निर्वाचित प्रतिनिधींना नामनिर्देशित सदस्यांद्वारे बदलण्याचा राज्य सरकारचा निर्णय

वृत्तसंस्था । नांदेड

**राज्यातील वैद्यकीय व्यावसायिकांचे नियमन करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवर (एमसीआय) मागील अनेक वर्षांपासून निवडणुकीद्वारे निवडून येणाऱ्या सदस्यांना हद्दपार करण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे. त्यावर वैद्यकीय क्षेत्रातून आता तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या आहेत.**

मागील काही दिवसांपासून वरील स्वायत्त संस्थेतील १८ पैकी ९ जागांसाठी निवडणूक घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. महाराष्ट्रातील अनेक नामांकित डॉक्टर्स या निवडणुकीच्या प्रचारानिमित्त रणरणत्या उन्हात राज्यभर फिरत असतानाचा राज्य मंत्रिमंडळाने या परिषदेतील सदस्यांची नियुक्ती निवडणुकीऐवजी नामनिर्देशन पद्धतीने करण्याचा निर्णय घेतल्यामुळे परिषदेच्या निवडणुकीच्या पुढील प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही निवडणूक घेतली जात आहे. ९ जागांसाठी राज्यभरातून ६० उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

शासनाच्या वरील निर्णयावर निवडणुकीतील एक उमेदवार डॉ.अमोल अन्नदाते यांनी कडक शब्दांत टीका केली आहे. वैद्यकीय व्यावसायिकांचे नियमन करणाऱ्या संस्थेत हुकुमशाही आणण्याचे पाऊल शासनाने टाकले असून त्याला राज्यातील सर्व डॉक्टरांनी विरोध केला पाहिजे. तसेच शासनाला आपला तुघलकी निर्णय मागे घेण्यास भाग पाडले पाहिजे, असे डॉ.अन्नदाते यांनी नमूद केले.

वरील संस्था १९६५ साली एका कायद्याद्वारे निर्माण करण्यात आली. मागील काही वर्षांपासून या संस्थेवर १८ प्रतिनिधी आहेत. त्यातील ९ जणं निवडणुकीद्वारे, पाच शासन नामनिर्देशित आणि चार वेगवेगळ्या संस्थांचे प्रतिनिधी असतात. कायद्यानुसार दर पाच वर्षांनी या संस्थेची निवडणूक घेण्याचे बंधन आहे. (पान २ वर)

## अमेरिका-भारत व्यापार करारावर लवकरच चर्चा

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

अमेरिकेबरोबर उच्च-स्तरीय व्यापार वाटाघाटी पुन्हा सुरू करण्यासाठी भारतीय अधिकाऱ्यांचे एक शिष्टमंडळ वॉशिंग्टनला पाठवले जाणार आहे. दोन्ही देश अंतरिम द्विपक्षीय व्यापार कराराच्या आराखड्याला अंतिम रूप देण्याच्या अगदी जवळ पोहोचले आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय शिष्टमंडळ अमेरिकेत जाणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात जवळपास ४० मिनिटे फोनवरून चर्चा झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी ही घडामोड समोर आली आहे. पीटीआयने सरकारी सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, भारत-अमेरिका व्यापार कराराचा पहिल्या टप्प्याला (पान २ वर)

## मी होर्मुझची सामुद्रधुनी कायमची खुली करतोय

### चीनचा इराणला शस्त्रपुरवठा न करण्याचा वायदा; ट्रम्प यांचा दावा

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

चीनने इराणला शस्त्रपुरवठा करणार नाही असा वायदा केल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. चिनी अध्यक्ष शी जिंगपिंग यांच्याशी स्वत: चर्चा करुन हा मुद्दा उपस्थित केल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. जिंगपिंग यांनी इराणला शस्त्रपुरवठा न करण्याची हमी दिली आहे, असे ट्रम्प म्हणाले. ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलफ या प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये मी होर्मुझ सामुद्रधुनी कायमची खुली करत असल्याचे म्हटले आहे. हे मी चीन आणि जगासाठी करतोय, असेही ट्रम्प यांनी पोस्टमध्ये स्पष्ट केले आहे.

डोनाल्ड ट्रम्प (पान २ वर)

# पाचोरा, जामनेर, बोदवड रेल्वे मार्गासाठी प्रशासनाची तयारी पूर्ण

## भूसंपादन प्रक्रिया अंतिम टप्प्यात; प्रत्यक्ष कामाला सुरूवात होण्याचा मार्ग मोकळा

प्रतिनिधी । जळगाव

**उत्तर महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा पाचोरा, जामनेर, बोदवड ब्रॉडगेज रेल्वे प्रकल्प निर्णायक वळणावर पोहोचला असून, भूसंपादन प्रक्रिया अंतिम टप्प्यात आल्याने आता प्रत्यक्ष कामाला सुरूवात होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला आता वेग येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**




पाचोरा-जामनेर या जुन्या नॅरोगेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करून तो पुढे बोदवडपर्यंत विस्तारित करण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. सुमारे ८४ किलोमीटर लांबीच्या या मार्गामुळे इतके दिवस उपेक्षित राहिलेला खान्देशचा काही भाग रेल्वेच्या मुख्य जाळ्याशी अधिक प्रभावीपणे जोडला जाणार आहे.

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री गतीशक्ती योजनेंतर्गत या प्रकल्पासाठी सुमारे ९५५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सुमारे ५६८ कोटी रुपयांचे कंत्राट अशोका बिल्डकॉन कंपनीला देण्यात आला आहे. निर्धारित कालावधीत म्हणजेच ३० महिन्यांत हे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. एप्रिल अखेरीस संपूर्ण भूसंपादन पूर्ण होईल आणि मे महिन्यापासून प्रकल्पाला प्रत्यक्ष गती मिळेल, अशी माहिती जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी माध्यमांना दिली आहे.

पहूर स्थानकाजवळ मालधक्का उभारण्यास मंजुरी मिळाल्यामुळे स्थानिक उद्योग, शेती उत्पादन आणि व्यापाराला मोठा फायदा होणार आहे. कापूस, केळी, धान्य यांसारख्या कृषी उत्पादनांची जलद वाहतूक शक्य होणार असून, शेतकऱ्यांना अधिक चांगल्या बाजारपेठांपर्यंत पोहोचता येईल. तसेच लघुउद्योग आणि व्यापाऱ्यांसाठीही हा मार्ग आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरणार आहे.

### पहूर स्थानकाजवळ मालधक्का

पाचोरा,जामनेर, बोदवड रेल्वेमार्गामुळे सध्या अत्यंत व्यस्त असलेल्या भुसावळ-मनमाड मुख्य मार्गावरील ताण मोठ्याप्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे. उत्तर महाराष्ट्रातून जाणाऱ्या मालगाड्यांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध झाल्यामुळे रेल्वे वाहतुकीत लक्षणीय सुधारणा होणार आहे. विशेषतः कोळसा, धान्य, खत आणि औद्योगिक मालवाहतुकीसाठी हा मार्ग अत्यंत उपयुक्त ठरणार असून, वाहतूक खर्च आणि वेळ दोन्ही कमी होण्यास मदत होईल. या प्रकल्पात माल वाहतुकीला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

## संपादकीय

### पश्चिम बंगालच लक्ष्य!

भाजपासाठी पश्चिम बंगालची निवडणूक फार महत्त्वाची आहे. तेथे सन २०११ पासून सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जींना या खेपेला पराभूत करून सत्ता मिळवता येईल, असा भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांचा होरा आहे. ९ एप्रिल रोजी पुद्दुचेरी, आसाम आणि केरळमध्ये मतदान झाले. आसाममध्ये विधानसभेच्या एकूण १२६ जागा तर केरळमध्ये १४० जागा आहेत. या आधी म्हणजे २०२१ मध्ये झालेल्या निवडणुकांत आसाममध्ये भाजपाप्रणित रालोआला ७५ जागा तर प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसला ५० जागा मिळाल्या होत्या. त्याचप्रमाणे केरळ राज्यात २०२१ मध्ये डावी लोकशाही आघाडीला ९९ जागा तर विरोधी आघाडी संयुक्त लोकशाही आघाडीला ४१ जागा मिळाल्या होत्या. या आधीच्या विधानसभा निवडणुकांत पुद्दुचेरीतील एकूण ३० जागांपैकी रालोआला स्पष्ट बहुमत मिळाले होते. यात भाजपाला ६ जागा तर ऑल इंडिया एन आर काँग्रेसला १० जागा मिळाल्या होत्या. आता झालेल्या मतदानाची आकडेवारीसुद्धा समोर आली आहे. त्यानुसार आसाममध्ये ८२ टक्के मतदान झाले तर केरळमध्ये ७६ टक्के झाले. या राज्यांतील निवडणुकांत वेगवेगळे मुद्दे प्रचारात होते. गेली अनेक वर्षे आसाम राज्य म्हटले की, विधानसभा निवडणुकांत स्थलांतर, विकास आणि आयडेंटीटी हे मुद्दे येतातच. हा प्रकार १९७० च्या दशकापासून फार जोरात सुरू झाला. या काळात तेथील विद्यार्थ्यांनी बेकायदेशीर घुसखोरांचा मुद्दा लावून धरला होता. यात आघाडीवर असलेले तेव्हाचे युवा नेते म्हणजे प्रफुल्लकुमार महांतो आणि भिकू फुकरन. यांनी नंतर आसाम गणतंत्र परिषद हा पक्ष स्थापन केला होता. असेच काहीशी वेगळी राजकीय संस्कृती असलेले राज्य म्हणजे केरळ. या राज्यात गेले अनेक दशकं आघाडीचे राजकारण स्थिरावलेले आहे. एका बाजूला कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व असलेली डावी लोकशाही आघाडी तर दुसरीकडे काँग्रेस पक्षाचे नेतृत्व असलेली संयुक्त लोकशाही आघाडी. चार राज्यांतील विधानसभा निवडणुका चर्चेत असल्या तरी भाजपासाठी पश्चिम बंगालची निवडणूक महत्त्वाची आहे. त्यामुळे निवडणुका जाहीर झाल्यापासून आणि खरं तर त्या आधीपासूनच भाजपाच्या नेत्यांनी पश्चिम बंगालवर लक्ष केंद्रित केले होते. भारतीय राजकारणाला ममता बॅनर्जी हे नाव नवीन नाही. २०११ मध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री होण्याअगोदरपासून त्या राजकीय जीवनात तळपत होत्या. त्यांनी कारकिर्दीची सुरुवात काँग्रेस पक्षातून केली. त्यांनी जादवपूर मतदारसंघातून १९८४ सालची लोकसभा निवडणूक जिंकली तेव्हा त्या सर्वात तरुण खासदार होत्या. या त्यांच्या विजयाचे आणखी मोठं वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते सोमनाथ चॅटर्जी यांचा पराभव केला होता. नंतरच्या लोकसभा निवडणुका मात्र त्यांनी दक्षिण कोलकाता मतदारसंघातून लढवल्या आणि जिंकल्या. १९९१ मध्ये त्यांनी नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळात संधी मिळाली. काही अभ्यासकांच्या मते त्यांची धडाकेबाज नेतृत्वशैली पश्चिम बंगालमधील काँग्रेसच्या प्रस्थापित नेत्यांना मान्य नव्हती. परिणामी आज ना उद्या त्या पक्षातून बाहेर पडतील, असा अंदाज होता. हा अंदाज १९९८ मध्ये खरा ठरला जेव्हा त्यांनी ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस हा पक्ष स्थापन केला. राजकीय अभ्यासकांना खरा धक्का बसला तो २०११ मध्ये जेव्हा ममतांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षप्रणित डाव्या आघाडीचा पराभव केला. ही आघाडी पश्चिम बंगालमध्ये सलग ३३ वर्षे सत्तेत होती! २०११ नंतर झालेल्या सर्व विधानसभा निवडणुका त्यांनी आरामात जिंकलेल्या आहेत. पश्चिम बंगालमध्ये सत्ता मिळावी यासाठी मोदी आणि शहा जीवाचं रान करत आहेत. ९ एप्रिल रोजी पंतप्रधान मोदींनी त्या राज्यांत तीन सभा घेतल्या. या आरोपांना ममतांनी लगेच उत्तरसुद्धा दिले. या निवडणुकीत आरोप-प्रत्यारोप झाले. आता २३ एप्रिल आणि २९ एप्रिल रोजी मतदान होईल आणि ४ मे रोजी मतमोजणी होईल. तेव्हा चित्र स्पष्ट होईल.

# खांडबारा ग्रा.पं. पोटनिवडणुकीत सरपंचपदासाठी सात उमेदवारी अर्ज दाखल

## नवापूर तालुक्यातील २१ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीची प्रक्रिया सुरू; २८ एप्रिलला होणार मतदान

प्रतिनिधी । नवापूर/खांडबारा

**तालुक्यातील खांडबारा येथील ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीत सरपंचपदासाठी सात उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे ही पोटनिवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेसच्या दीपाली जगदीश गावित यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तालुक्यातील २१ ग्रामपंचायतींसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीची प्रक्रिया सध्या वेगात सुरू आहे. दि. ७ ते १३ एप्रिल या कालावधीत उमेदवारांकडून नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर खांडबारा ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. आतापर्यंत सात उमेदवारांनी आपली उमेदवारी दाखल केली आहे. अजून किती उमेदार आर्ज दाखल करतात? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. दि.१३ एप्रिलअखेर सरपंच पदासाठी विक्रम गावीत, रंजना अविनाश गावीत, मोगरा मिलिंदकुमार वसावे, आर्यन गणेश पाडवी, स्नेहल गणेश पाडवी, दीपाली जगदीश गावीत आणि अविनाश जगदीश गावीत यांनी निवडणूक रिंगणात उतरत अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे खांडबारा येथील सरपंचपदाची लढत चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, आज सकाळी ११ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या नेतृत्वाखाली दीपाली जगदीश गावीत यांनी भव्य शक्तीप्रदर्शन करत आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले. खांडबारा गावातील उत्स्फुर्त सहभाग दिसून आला. घोषणाबाजी आणि समर्थकांचा उत्साह यामुळे संपूर्ण परिसर निवडणूकमय झाला. यावेळी भरत गावीत, नगराध्यक्ष जयवंत जाधव, उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे, बांधकाम सभापती भालचंद्र गावीत, पाणीपुरवठा सभापती शरद पाटील, नगरसेवक वतन अग्रवाल, युवा उद्योजक धनजय गावीत, अमत लोहार, माजी पं.स. सभापती राजेश गावीत, माजी नगगसेवक फारुक शहा, माजी सरपंच अविनाश गावीत आदी उपस्थित होते. यानंतर दीपाली गावीत यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडळ अधिकारी लहु चव्हाण, आर. बी. नाईक आणि राजेंद्र गायवाड यांच्याकडे नामनिर्देशन पत्र सुपूर्द केले. यावेळी बोलताना ज्येष्ठ नेते भरत गावीत यांनी सांगितले की, खांडबारा पोटनिवडणुकीत सरपंचपदासाठी दीपाली गावीत या प्रचंड १ मताधिक्क्याने विजयी होतील, यात कोणतीही शंका नाही. तसेच ग्रामपंचायत सदस्यपदासाठीही एकता विकास पॅनलतर्फे उमेदवारी देण्यात आली आहे. वार्ड क्रमांक ३ मधून मंगला गावीत आणि वार्ड क्रमांक ५ मधून मोगरा वसावे यांनी आपले अर्ज दाखल केले आहेत.

स्व. प्रकाशआण्णा चौधरी यांच्या संकल्पनेतून उभ्या राहिलेल्या या एकता विकास पॅनलमार्फत गावाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे. माजी सरपंच अविनाश गावीत यांच्या कार्यकाळात गावात झालेल्या विकासकामांचा उल्लेख करत त्यांच्या नेतृत्वाखाली गावात ऐक्य निर्माण झाले असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. विरोधकांनी केलेल्या तक्रारींमुळे त्यांना पद सोडावे लागले असले तरी जनतेचा विश्वास आजही त्यांच्या पाठीशी असल्याचा दावा करण्यात आला.

यावेळी राजेंद्र गावीत, मुकुंद रामराजे, मगन वळवी, सलीम खाटीक, रुबाब खाटीक, राजेश नाईक, विकी नाईक, दत्तु बसावे, आकेश वळवी, विनोद गोसावी, गोकुळ सिंधी, अभिजीत रामराजे, गोलू नाईक, सागर पाडवी, दिलीप वसावे, महेंद्र वसावे, वंकर वसावे आदी उपस्थित होते. दि.२८ एप्रिल रोजी होणाऱ्या या निवडणुकीत एकता विकास पॅनलचे सर्व उमेदवार प्रचंड मतांनी विजयी होतील, असा ठाम विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला असून खांडबारा ग्रामपंचायतीची निवडणूक आता अधिकच रंगतदार होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

# विसरवाडी येथे हस्ती बँकेच्या वर्धापनदिनानिमित्त रक्तदान शिबीर

प्रतिनिधी । नवापूर

**तालुक्यातील विसरवाडी येथील हस्ती को-ऑपरेटिव्ह बँकेच्याा १० वा वर्धापनदिन सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. विसरवाडी येथील हस्ती को-ऑपरेटिव्ह बँक दोंडाईचा अंतर्गत विसरवाडी शाखेचा १० वा वर्धापनदिन विविध कार्यक्रमांनी पार पडला.**



यानिमित्त रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला आहे. विशेषतः रक्तदान शिबिरात महिलांचा उल्लेखनीय सहभाग पाहायला मिळाला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी विसरवाडी येथील ज्येष्ठ नागरिक हनुमानप्रसाद अग्रवाल, हिरालाल अग्रवाल, कांतीलाल कटारिया, खत्तवान शिवीर, नगीनदास अग्रवाल, प्रा. प्रमोद मांडे व बाळू साळुंखे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सत्यनारायण महापूजेचा मान नेहा व जयेश अग्रवाल यांना देण्यात आला.

कार्यक्रमास हस्ती को-ऑपरेटिव्ह बँक दोंडाईचाचे अध्यक्ष कैलास जैन तसेच विसरवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. आरोग्य शिबिरात नंदुरबार येथील सुप्रसिद्ध तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी केली. यामध्ये अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. त्रंबक पटेल, मधुमेह तज्ज्ञ डॉ. रोशन भंडारी, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. विशाल देसर्डा, दंतरोग तज्ज्ञ डॉ. मानसी कटारिया व डॉ. यश अग्रवाल यांनी सेवा दिली. एकूण १२५ लाभार्थ्यांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. आवश्यक औषधांचेही मोफत वितरण करण्यात आले. रक्तदान शिबिरासाठी नंदुरबार येथील जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. अर्जुन लालचंदानी व त्यांच्या पथकाने रक्त संकलन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विसरवाडी शाखा सल्लागार समितीचे अध्यक्ष योगेश हिरालाल अग्रवाल, उपाध्यक्ष प्रा. प्रमोद मांडे, विनोदकुमार अग्रवाल, राजेश कटारिया, जयेश अग्रवाल, बाळू साळुंखे, शाखा व्यवस्थापक चंद्रकांत ईशी, खालिद सैय्यद, पुनित वाणी, वैभव सूर्यवंशी, स्वप्नील वळवी, विरसिंग वसावे, किसन हिरे, जावेद खाटीक व किर्तेश अग्रवाल यांनी परिश्रम घेतले.

# माजी खा. डॉ. गावितांकडून महात्मा फुलेंना अभिवादन

प्रतिनिधी । नंदुरबार

**क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशतकीय जयंतीनिमित्त नंदुरबार शहरातील माळीवाडा परिसरात उभारण्यात आलेल्या महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला माजी खा. डॉ. हीना गावित यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच सामाजिक एकात्मतेचा आणि प्रेरणेचा संदेश दिला.**

याप्रसंगी माळी समाज पंचमंडळाचे अध्यक्ष तथा नगरसेवक आनंदा माळी, उपाध्यक्ष किसन माळी, नगरपालिका विरोधी पक्षनेते हिरालाल चौधरी, नगरसेवक लक्ष्मण माळी, सामाजिक कार्यकर्ते माणिक माळी, संभाजी माळी, पप्पू कुरेशी यांच्यासह माळी समाजातील मोठ्या संख्येने बांधव व महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमात बोलताना डॉ. हीना गावित यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्याचा उल्लेख करत त्यांच्या विचारांचे आजच्या काळातही महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण, समता आणि सामाजिक न्याय यासाठी त्यांनी लढा दिला.



## पान १ वरून

**महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेतील......**

मागील काही महिन्यांपूर्वी या संस्थेची निवडणूक सुरू असतानाच न्यायालयीन प्रकरणामुळे ती थांबली होती. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आणि आता या न्यायालयाच्या आदेशानुसारच निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया सुरू असतानाच शासनाने नवा निर्णय घेतल्यानंतर वैद्यक व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली. या संस्थेवरील सर्वच वैद्यकीय प्रतिनिधी नामनिर्देशित करण्याचा घाट शासनाने घातला आहे. त्यासाठी एका उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीचा आधार घेण्यात आला आहे; पण हा निर्णय स्वायत्त संस्थांमधील लोकशाही मूल्यांसाठी हानीकारक असल्याची प्रतिक्रिया माजी राज्यमंत्री डॉ.माधव किन्हाळकर यांनी येथे व्यक्त केली. शासनाच्या या निर्णयावर इंडियन मेडिकल असोसिएशनची भूमिका अद्याप कळू शकली नाही; पण शासनाच्या निर्णयाविरुद्ध राज्यातील सर्वच नोंदणीकृत एमबीबीएस डॉक्टरांनी आवाज उठवला पाहिजे, अशी या असोसिएशनशी संबंधित अनेक डॉक्टरांची भूमिका असल्याचे सांगण्यात आले.

**युद्ध थांबवण्यासाठी शी जिनपिंग......**

हल्ल्यांवर टीका केली असून शत्रुत्व संपवण्याचे आवाहन केले आहे. चीनने होर्मुझच्या सामुद्रधुनीतील अखंड वाहतुकीचे आवाहन केले आहे. होर्मुझची सामुद्रधुनी ही वस्तू आणि ऊर्जेसाठी एक महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय व्यापारी मार्ग आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी एका पत्रकार परिषदेत सांगितले की, प्रदेश सुरक्षित आणि स्थिर ठेवणे आणि निर्बाध हालचाल सुनिश्चित करणे हे आंतरराष्ट्रीय समुदायाच्या सामूहिक हिताचे आहे.

**संशोधन, जिज्ञासा, निरंतर......**

सन्मानाने वागायला हवे. डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील विश्वास टिकवून ठेवण्यासाठी हे गरजेचे आहे, असा मोलाचा सल्लाही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी दिला. आरोग्य सेवा क्षेत्र सातत्याने बदलत आहे. जगभरात नवनवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल आरोग्य सेवा आणि प्रगत संशोधनाच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती होत आहे. आपण हे बदल आत्मसात करून पुढे वाटचाल केली पाहिजे. तंत्रज्ञान विकासाचा उपयोग ग्रामीण आणि शहरी भागांतील आरोग्य सुविधांची दरी कमी करण्यासाठी आणि सर्वांना दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी केला पाहिजे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. गेल्या दशकभरात केंद्र सरकारने आरोग्य सेवांच्या क्षेत्रात अनेक महत्त्वाची पावले टाकली आहेत. 'आयुष्मान भारत योजना, 'आयुष्मान आरोग्य मंदिरा'ची स्थापना, डिजिटल हेल्थ मिशन, लसीकरण कार्यक्रमांचा विस्तार, गंभीर आजारांच्या नियंत्रणासाठी राष्ट्रीय टीबी निर्मूलन कार्यक्रम, राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग आणि राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम राबवले जात आहेत. लोकांना स्वस्त आणि दर्जेदार औषधे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अमृत फार्मसी आणि जन औषधी केंद्र उघडण्यात आली आहेत, असा उल्लेखही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या भाषणात केला.

**अमेरिका-भारत व्यापार......**

आकार देण्यामध्ये ही आगामी चर्चा निर्णायक भूमिका बजावेल. या करारासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून वाटाघाटी केल्या जात आहेत.अधिकाऱ्यांनी सूचित केले की, या बैठकीत रखडलेल्या मुद्द्यांची सोडवणूक करण्यावर लक्ष केंद्रीत केले जाईल, विशेषतः अमेरिकेच्या टॅरिफ धोरणात नुकतेच करण्यात आलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा होईल. भारत आणि अमेरिका यांच्यातील या अंतरिम करारावर सुरुवातीला मार्च महिन्यात स्वाक्षरी केली जाणार होती.

ज्यासाठी दोन्ही देशांचे प्रमुख वाटाघाटीकार हे फेब्रुवारी महिन्यात एकत्र येणार होते, तसेच या बैठकीत कराराच्या मसुद्याला अंतिम रूप दिले जाणार होते.मात्र अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर तेथील टॅरिफ स्ट्रक्चर बदलले यामुळे ही प्रक्रिया लांबणीवर पडली.

**मी होर्मुझची सामुद्रधुनी......**

यांनी केलेल्या पोस्टमध्ये होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी अमेरिका करत असलेल्या प्रयत्नांना चीनने पाठिंबा दिल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच, चीन इराणला शस्त्रपुरवठा करणार नाही, अशी हमी देखील त्यांनी दिल्याचे ट्रम्प पोस्टमध्ये म्हणत आहेत. होर्मुझ खुली करण्याचा निर्णयामुळे चीन खूप आनंदी असल्याचेही ट्रम्प यांनी म्हटले आहे.
'मी होर्मुझ सामुद्रधुनी कायमची खुली करतोय, यामुळे चीन खूप खूश आहे.हे मी त्यांच्यासाठी आणि संपूर्ण जगासाठी करतोय. ही परिस्थिती पुन्हा उत्पन्न होणार नाही. इराणला शस्त्रपुरवठा करणार नाही, यासाठी चीनने सहमती दर्शवली आहे.

# गर्भपाताच्या गोळ्यांच्या अतिसेवनाने अविवाहित तरुणीचा मृत्यू

प्रतिनिधी । धुळे

**धुळे शहरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. गर्भपाताच्या अधिक गोळ्यांचे सेवन केल्याने एक अविवाहित तरुणीचा मृत्यू झाला आहे. धुळे शहरापासून जवळच असलेल्या एका गावात हा धक्कादायक प्रकार घडला. मृत तरुणी सहा महिन्यांची गरोदर असल्याचे वैद्यकीय तपासणीत समोर आले आहे.**



मृत १८ वर्षीय तरुणीस देवपुरातील खासगी रुग्णालयात दाखल केले होते. डॉक्टरांनी तपासल्यावर मुलगी गरोदर असल्याचे समजले. अविवाहित तरुणीच्या मृत्यूप्रकरणी मोहाडी पोलिसांत नोंद केली आहे.पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित १८ वर्षीय तरुणी ही धुळे शहरापासून जवळ असलेल्या एका गावातील रहिवसी होती. तिची अचानक प्रकृती खालावल्यामुळे देवपुरातील एका खासगी रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी तपासणी केली असता, ती तरुणी २४ आठवड्यांची (६ महिने) गरोदर असल्याचे निष्पन्न झाले. गरोदरपणा लपवण्यासाठी किंवा गर्भपात करण्यासाठी तिने काही औषधांचे सेवन केले होते, अशी माहिती डॉक्टरांनी तिच्या कुटुंबीयांना दिली. गर्भपाताच्या गोळ्यांचे प्रमाण अधिक झाल्यामुळे तरुणीचा रक्तदाब वेगाने कमी झाला आणि तिला झटके येऊ लागले. तिची प्रकृती चिंताजनक झाल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तिला तातडीने हिरे शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. तेथील अतिदक्षता विभागात उपचार सुरू असताना त्या तरुणीची प्राणज्योत मालावली.या घटनेची माहिती मिळताच मोहाडी पोलिसांनी रुग्णालयात धाव घेतली. पोलिसांनी या प्रकरणी सध्या अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. मात्र, इतक्या मोठ्या कालावधीचा गर्भ पाडण्यासाठी तिला गोळ्या कोणी दिल्या? तो तरुण कोण होता? आणि यामागे कोणाचे रॅकेट आहे का? याचा तपास आता पोलिसांनी सुरू केला आहे.

# गावठी कट्टा-कोयत्यासह दोघांना ठोकल्या बेड्या

प्रतिनिधी । जळगाव

शहरात गावठी कट्टा आणि धारदार कोयत्यासारखी शस्त्रे बाळगून दहशत माजवणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना एमआयडीसी पोलिसांनी सिनेस्टाईलने पाठलाग करून अटक केली आहे. त्यांच्याकडून एक गावठी बनावटीचा कट्टा, रिकामी मॅगझीन आणि मोटारसायकलसह एकूण ७०,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जळगावातील कासमवाडी परिसरात दोन तरुण शस्त्रांसह फिरत असल्याची माहिती एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुन्हे शोध पथकाने तात्काळ नेरी नाका परिसरात सापळा रचून रोहित गोपाळ कुंवर (वय २२, रा. कासमवाडी), सागर रामा सोनवणे (वय २१, रा. मेस्का माता नगर) यांना अटक केली आहे.

# अमळनेर तालुक्यात भूजलपातळी घटली!

## पाडळसरे परिसरातील तापी, बोरी, पांझरा पट्ट्यात केळी, पपईला बसला फटका

प्रतिनिधी । अमळनेर

**अमळनेर तालुक्यातील मुख्य नदी तापी व उपनद्या बोरी आणि पांझरा पट्ट्यात पाण्याची सोय असल्यामुळे सर्वाधिक केळी, पपई आणि उसाची लागवड केलेली आहे. मात्र, भूजल पातळी खालावल्याने आणि नद्या प्रवाहीत होण्याचे बंद झाल्याने केळी, पपईची पिके वाचवणे जिकिरीचे झाले आहे. त्यात सलग चार दिवस उन्हाची तीव्रता एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यातच ४० अंशावरच्या वर गेल्याने पाडळसरे परिसरातील तापी पांझरा, बोरी भागातील पपई व केळीची कोवळी पाने जळून केळी, पपई पिके कोमेजून गेली.**



पीकविमा कवच घेतलेल्या शेतकऱ्यांनी कंपनीकडे कळवूनही आतापर्यंत कंपनीकडून दखल घेतली गेली नाही. दुपारी उन्हाची तीव्रता अधिक असल्यामुळे दुपारी सलग दोन तास केळीला पाणी देण्यासाठी शेतकरी भर उन्हात चटके सोसून केळीला चटके बसण्यापासून वाचवण्याची धडपड करीत आहे.

अमळनेर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात झपाट्याने वाढ होत आल्याचे दिसून येत आहे. एप्रिल महिन्याच्या मध्यावर उन्हाचा पारा ४० अंशसेल्सियसच्या पुढे गेला आहे. या उष्णतेच्या लाटांमुळे जमिनीतील पाणी अधिक वेगाने कमी होत असून, याचा थेट परिणाम भूजल पातळीवर होत आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासून उन्हाच्या झळा बसू लागल्याने पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. याचाच परिणाम म्हणून अमळनेर तालुक्यातील आठ गावांना आतापासूनच पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींनी तळ गाठायला सुरुवात झाल्याने गावाला व पशुधनाला पिण्यासाठी पाणी उपलब्ध करतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

त्यामुळे पाणी टंचाईवर परिणाम म्हणून तालुक्यातील चौबारी, गडखांब, धुपी, मांजर्डी, धानोरा, भोरटेक, पळासदडे, जुनोने या आठही गावांसाठी पाणी टंचाई निवरणार्थ विहिरी अधिग्रहण करण्यासाठी ग्रामपंचायतकडून प्रस्ताव अमळनेर पंचायत समितीत सादर करण्यात आला आहे. त्यावर गटविकास अधिकारी एन.आर.पाटील यांनी त्यातील गडखांब, धुपी, मांजर्डी, जुनोने या गावांचा विहीर अधिग्रहणसाठी तहसीलदारांना प्रस्ताव मंजुरीसाठी सादर केला आहे. तर चौबारी आणि पळासदडे या गावाचे प्रस्ताव पाणीपुरवठा विभागाकडे सादर करून लवकरच मंजूर होतील, अशी माहिती पाणी टंचाई कक्षाचे दीपक पाटील यांनी दै.'शौर्य मराठी'शी बोलतांना दिली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# जळगावातून एटीएम मशीन पळवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; दोन संशयित पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील एका खासगी बँकेचे एटीएम मशीन पळवून नेणाऱ्या आंतरराज्यीय सराईत गुन्हेगार टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला असून, दोन संशयितांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे महाराष्ट्रासह झारखंड तसेच उत्तर प्रदेशात सक्रिय असलेल्या गुन्हेगारी जाळ्याचा उलगडा झाला असून, त्यांच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.**




जळगाव शहरातील पोलन पेठ परिसरातील सत्यम प्लाझा संकुलातील इक्विटास स्मॉल फायनान्स बँकेचे एटीएम मशीन चोरीच्या मालवाहू वाहनातून पळवून नेल्याची घटना तीन एप्रिलला घडली होती. अज्ञात चोरट्यांनी त्यातील सुमारे सात लाखांची रोकड लंपास केल्याप्रकरणी जळगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असताना, पोलीस अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपास करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पथक काही दिवसांपासून कार्यरत होते. तपासादरम्यान पोलन पेठेतील एटीएम पळवून नेणारी टोळी पुन्हा जळगाव शहरात येणार असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी मंगळवारी मन्यारखेडा रस्त्यावर सापळा रचला.

पाच जणांचा गुन्ह्यात सहभाग

पथकाने संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवून योग्य वेळी कारवाई करत दोन जणांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी फरहान, अकबर आणि मुजाहीद या अन्य तीन साथीदारांसह जळगावसह इतर राज्यांमध्ये एटीएम मशिन फोडून चोरी केल्याची कबुली दिली. अटक करण्यात आलेल्या दोन संशयितांमध्ये मोबीन आलम मिला (२८, रा. बेगी नाजर, ता. नकूर, जि. सहारनपूर, उत्तर प्रदेश) आणि अब्दुल करीम नूर हसन (५२, रा. तितरोद, ता. नकूर, जि. सहारनपूर, उत्तर प्रदेश) यांचा समावेश आहे. या दोघांवर यापूर्वीही महाराष्ट्र, झारखंड आणि उत्तर प्रदेशातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर गुन्हे दाखल असून, ते सराईत गुन्हेगार असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. अन्य तिघांचा शोध पोलिसांकडून घेण्यात येत आहे.

६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

कारवाईत पोलिसांनी दोन्ही संशयितांकडून एकूण ६१,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ज्यामध्ये सुमारे ५०,००० रुपये किमतीची दुचाकी, १०,००० रुपये किमतीचा भ्रमणध्वनी, ७०० रुपये रोख रक्कम तसेच ५०० रुपये किमतीचे दोन हेल्मेट यांचा समावेश आहे. जप्त केलेली दुचाकी ही चोरीची असल्याचेही निष्पन्न झाले आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि प्रत्यक्ष पाळत ठेवून ही यशस्वी कारवाई केली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश आहेर करीत आहे.

# पथदिव्यांचा विषय अन् महासभेत बत्ती गूल

## मनपाच्या महासभेत मूलभुत सुविधांसह विविध विषयांवर प्रशासनाला धरले धारेवर

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महापालिकेच्या महासभेत पथ दिव्यांचा विषय सुरु असताना सभागृहात बत्ती गूल झाल्याने जनरेटर सुरु होईपर्यंत लोकप्रतिनिधींसह अधिकाऱ्यांना अंधारात बसावे लागले. तसेच जळगाव शहरातील गटारी,रस्ते यासह महत्वाचे मूलभुत प्रश्न सभागृहात नगरसेवकांनी मांडले. त्यावरुन अधिकाऱ्यांना धारेवर धरले.**



बुधवारी महापालिकेच्या दुसऱ्या मजल्याच्या सभागृहात महापौर दीपमाला काळे यांच्या अध्यक्षतेखाली महासभा घेण्यात आली. यावेळी उपमहापौर मनोज चौधरी, मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, नगरसचिव सतिश शुक्ला आदी उपस्थित होते. गेल्या १५ वर्षांपासून जळगावकरांना पिवळ्या पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. पाण्याच्या टॉक्या सफाई होत नसल्याने नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली.

## जळगाव मनपा स्वीकृत नगरसेवकपदी ७ जणांची बिनविरोध निवड

शहर महानगरपालिकेच्या रिक्त असलेल्या स्वीकृत नगरसेवक पदासाठी दि.१५ एप्रिल रोजी झालेल्या विशेष महासभेत सर्वपक्षीय ७ उमेदवारांची एकमताने निवड करण्यात आली. यामध्ये भारतीय जनता पक्षातर्फे ४, शिवसेना (शिंदे गट) २ आणि शिवसेना (ठाकरे गट) १ अशा सदस्यांचा समावेश आहे. निवडीची घोषणा होताच महानगरपालिका प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात ढोल-ताशांच्या गजरात गुलालाची उधळण करत जोरदार जल्लोष करण्यात आला. महासभेत पीठासीन अधिकारी तथा महापौर दीपमाला काळे यांनी नवीन स्वीकृत नगरसेवकांच्या नावांची अधिकृत घोषणा केली. यात भारतीय जनता पक्षतर्फे जिल्हाध्यक्ष डॉ.राधेश्याम चौधरी, रमेश मतानी, प्रदीप रोटे, सुभाष शौचे, शिवसेना (शिंदे गट)तर्फे हर्षल मावळे, नरेंद्र आत्माराम पाटील, शिवसेना (ठाकरे गट)तर्फे महानगरप्रमुख शरद तायडे यांची निवड जाहीर झाली. या निवडीनंतर महापौर दीपमाला काळे आणि उपमहापौर मनोज चौधरी यांनी नवनियुक्त सदस्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

# संविधानाचा मार्ग स्वीकारून सामाजिक समता साध्य करावी

## स्वाभिमान मेळाव्यात जिल्हाधिकारी रोहन घुगे यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी । जळगाव

**समाजातील असमानता दूर करण्यासाठी संविधानाचा मार्ग स्वीकारणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले.**


भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम तसेच कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान मेळावा जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. या कार्यक्रमाला महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर, स्थायी समिती सभापती चंद्रशेखर पाटील, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त चित्रकार तथा लेखक राजू बाविस्कर, समाज कल्याण विभागाचे उपायुक्त राकेश महाजन, ज्येष्ठ रंगकर्मी शंभू पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी, सहायक आयुक्त योगेश पाटील, प्रकल्प अधिकारी अरुण पवार, विशेष अधिकारी, अमोल कुलकर्णी, कार्यालय अधीक्षक राजेंद्र कांबळे उपस्थित होते. जिल्हाधिकारी घुगे म्हणाले की, भारत हा विविधतेने नटलेला देश आहे, पण त्यात असमानताही आहे. ही असमानता दूर करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचा मार्गच आपल्याला तारू शकतो. युवकांना मार्गदर्शन करताना त्यांनी सोशल मीडियाच्या युगातही सखोल अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. बाबासाहेबांचे अर्थशास्त्र, कामगार कायदे तसेच रिझर्व बँक ऑफ इंडिया स्थापनेतील योगदान नमूद करत स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्ये दैनंदिन जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमाच्या सुरुवातीला वसतीगृहाच्या अंकिता गजरे या विद्यार्थिनीने उत्कृष्ट पणे पोवाडा सादर केल्याबद्दल तीचे कौतुक केले. तसेच साहित्य अकादमी पुरस्कार विजेते राजू बाविस्कर यांच्या यशाचा उल्लेख करत जळगाव जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण असल्याचे त्यांनी नमूद केले. महापौर दीपमाला काळे, जि.प.सीईओ करिष्मा नायर यांच्यासह मान्यवरांची भाषणे झाली. सूत्रसंचलन हर्षल पाटील यांनी केले. आभार अमोल कुलकर्णी यांनी मानले.

## थोडक्यात

### पिंप्री खुर्द येथे त्रिरत्न ॲग्रोतर्फे बाबासाहेबांना अभिवादन

**धरणगाव ।** तालुक्यातील पिंप्री खु. येथील त्रिरत्न ॲग्रो सेंटरच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. याकार्यक्रमात बहुजन समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बाबासाहेबांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. कार्यक्रमास धरणगाव पं.स. चे माजी सभापती डी. ओ. पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मनोज मालू, केवलसिंग पाटील, ॲड. योगेश गजरे, धनराज मनोरे सर, आबासाहेब धोबी, बाळू चौधरी, प्रकाश लोखंडे, गौतम दोडे, गौतम गजरे, तोहित खाटिक, भुराभाई बागवान, सद्दाम खाटिक, श्रीराम बडगुजर, समाधान पाटील, मोहन शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तद्नंतर उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व विशद केले. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, संघटन आणि संघर्ष या तत्वांचे पालन करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान सर्व बांधवांनी एकत्र येत बाबासाहेबांच्या कार्याला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. संपूर्ण कार्यक्रम अतिशय आनंदी वातावरणात पार पडला.

### काँग्रेस भवनात महामानवास अभिवादन



**जळगाव ।** भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त काँग्रेस भवनात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील, विष्णू घोडेस्वार, जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर कोळी, शहर सरचिटणीस प्रदीप सोनवणे, जगदीश गाढे, देविदास ठाकरे, युवराज खडके, भाईदास पावरा, अरुणा पाटील उपस्थित होते.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ठिकठिकाणी अभिवादन

प्रतिनिधी । जळगाव

**महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त जळगाव शहरासह जिल्ह्यातील विविध ठिकाणी प्रतिमा पूजन करुन अभिवादन करण्यात आले. तसेच काही ठिकाणी सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रमातून बाबासाहेबांच्या कार्याला उजाळा दिला.**



### महागौतमी महिला संघ

भारतीय समाजाच्या मानसिकतेला ज्यावेळी अनिष्ट रूढी परंपरांनी वेढलेले होते. त्यावेळी सामाजिक सुधारकांनी जो बदल घडवून आणला त्या बदलाला खऱ्या अर्थाने संविधानिक स्वरूपाची मान्यता देण्याचे काम ज्ञानाच्या बळावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. म्हणूनच भारतीय स्त्रियांच्या संविधानिक मुक्तीचे तेच खऱ्या अर्थाने मुक्तिदाते असल्याचे मत डॉ. मिलिंद बागुल यांनी केले. महागौतमी महिला संघ तक्षशील परिवाराने आयोजित केलेल्या सोनीनगर, गणपती नगर, ओमकार पार्क, अथर्व रेसिडेन्सी, प्रल्हादनगर भागातील नागरिकांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या सर्व धर्म जोपासणारा सर्वसमावेशक कार्यक्रम आयोजित केला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगीता भालेराव होत्या. विचार मंचावर माधुरी बिऱ्हाडे, आशा सुरळके, उपप्राचार्य प्रा.डॉ.सत्यजित साळवे, सुनील सोनवणे, विनोद निकम, जय महाराष्ट्र संघटनेचे पालक अध्यक्ष आर. टी.सोनवणे आदी उपस्थित होते. ज्योती निकम, सुनिता सरदार पाटील, शिलाबाई सपकाळे, सिंधुबाई जाधव, सोनाली आकाश सोनवणे, यशवंत पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रमुख अतिथी डॉ. सत्यजित साळवे यांनी आपल्या मनोगतात स्त्रियांच्या अनेक वर्ष असणाऱ्या गुलामगिरीतून हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून सुटका करणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या न्याय हक्कासाठीच कायदेमंत्री पदाचा राजीनामा देत एक नवा इतिहास घडवला. या इतिहासातून निश्चितपणे स्त्रियांनी जे धडे घेतले आणि त्याच्यातून आपल्या शिक्षणाची वाटही समृद्ध करून घेतली. त्यामुळेच भारतीय सामाजिक, सांस्कृतिक इतिहासाच्या वाटा समृद्ध होत गेल्याचे मत त्यांनी याप्रसंगी मांडले. सुनील सोनवणे, आर.टी.सोनवणे यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बापूराव पानपाटील यांनी केले तर आभार दिव्या निकम यांनी मानले.

### कंजरभाट समाज युवा फाऊंडेशन

कंजरभाट समाज युवा फाऊंडेशनतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त जळगाव रेल्वेस्थानक येथील बाबासाहेबांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी डॉ.आंबेडकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक तसेच भारतीय संविधान निर्मितीतील महान कार्याची यावेळी आठवण करून देत समाजात समानता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जोपासना करण्याचा संकल्पही उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. या कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्वांनी एकत्र येत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्याचे आवाहन केले.



यावेळी अध्यक्ष योगेश बागडे, सचिव राहुल नेतलेकर, वीर दहियेकर, संदीप गारुंगे, गणेश बागडे, गणेश बागडे, कार्तिक बाटूंगे, राहुल दहियेकर आदी समाजबांधव उपस्थित होते.

### राष्ट्रवादी काँग्रेस



जळगाव रेल्वेस्टेशन येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार महानगरतर्फे भारतरत्न डॉ बाबासाहेब अंबेडकर जयंतीनिमित्त बाबासाहेबांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रमोद बापू पाटील, महानगराध्यक्ष एजाज मलिक, विकास पवार, वाय. एस.महाजन, महिला जिल्हाध्यक्षा कल्पिता पाटील, युवक अध्यक्ष विनायक पाटील, सुरेश पगारे, अशोक लाड़वंजारी, प्रतिभा शिरसाठ, सुनील माळी, राजू मोरे, मज़हर पठान, महाडिक, मुकेश पाटील, संजू पाटील, अकील पटेल, उत्तम शिंदे, कृष्णा काळे, सी.वाय.देशमुख, जावेदभाई, गणेश मोजर, गौरव वाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

### पवन चॅरिटेबल ट्रस्ट-अर्पण सेवा ट्रस्ट





डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती हा केवळ उत्सव नसून तो समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचा सोहळा आहे. यानिमित्ताने बहिणाबाई विद्यालयात पवन चॅरिटेबल ट्रस्ट व अर्पण सेवा ट्रस्टतर्फे वैचारिक, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना संविधान वाचन, पुस्तक प्रदर्शन आणि त्यावर चर्चा करण्यात आली. आयेशा तडवी, वेदश्री पाटील, खुशी खडसे, तेजश्री जगताप, खुशी सोनवणे, मीनल महाले, उर्वशी कोळी, राहुल बारी या विद्यार्थ्यांनी पोवाडा आणि नाटिका सादर केल्या. मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. शिक्षित बना, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा बाबासाहेबांचा संदेश प्रतिभा खडके यांनी विद्यार्थ्यांना पोहोचवण्याबाबत भर देण्यात आला. मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक असून ते सामाजिक न्याय, समानता आणि मानवाधिकाराच्या लढ्याचे प्रतीक होते. ते केवळ भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार नव्हे तर एक महान समाजसुधारक, विचारवंत आणि मानवतावादी व्यक्तिमत्व होते, असे उद्गार यावेळी त्यांनी काढले. संस्थेचे अध्यक्ष बंडू काळे, सचिव लीलाधर नारखेडे यांचे याप्रसंगी सहकार्य लाभले. यशस्वीतेसाठी सीमा चौधरी, डॉ. प्रतिभा राणे, संतोष सोनार यांनी परिश्रम घेतले.

### डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय



येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.प्रशांत सोळंके, संचालक डॉ.एन.एस.आर्वीकर, रजिस्टर प्रमोद भिरूड, संगणक विभागाचे भूषण चौधरी उपस्थित होते. यावेळी माजी खासदार डॉ. उल्हास पाटील यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगण्याचे माध्यम असलेल्या संविधानाची निर्मिती करून समाजातील वंचित घटकांना न्याय दिला. देशातच नव्हे तर जगातील अनेक मोठ्या राष्ट्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृती आजही जतन करून ठेवलेले दिसून येतात. आजच्या जयंतीच्या दिवशी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना गोदावरी फाउंडेशनतर्फे विनम्र अभिवादन करत असल्याचेही डॉ. उल्हास पाटील यांनी सांगितले.

### युवा कल्याण प्रतिष्ठान,अमळनेतर्फे वक्तृत्व स्पर्धा



**अमळनेर ।** महात्मा ज्योतिराव फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त युवा कल्याण प्रतिष्ठान, अमळनेरतर्फे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. महात्मा ज्योतिराव फुले जीवन व कार्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन व कार्य असे वक्तृत्व स्पर्धेचे विषय होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.डॉ. लीलाधर पाटील, प्रा.डॉ.राहुल निकम, अशोक बिऱ्हाडे यांनी काम पाहिले. महापुरुषांच्या विचारांचा प्रचार करण्यासाठी युवा वक्ते तयार व्हावेत म्हणून सदर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांक अखिलेश मनोज पाटील, द्वितीय क्रमांक सायली योगराज पाटील तर तृतीय क्रमांक पल्लवी रामकृष्ण पाटील यांनी पटकावला. या स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस १००० रुपयांचे तर द्वितीय ७५० व तृतीय ५०० व सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्रे देण्यात आली. स्पर्धेच्या बक्षिसाचे प्रायोजकत्व अनुक्रमे शाम पाटील, वंदना ठेंगे व चिंधु वानखेडे यांनी स्वीकारले होते. विजेत्या स्पर्धकांना माजी केंद्रप्रमुख गोकुळ पाटील, हरिश्चंद्र कढरे, प्रा.अशोक पवार, दयाराम पाटील, बापूराव ठाकरे यांच्या हस्ते बक्षिसांचे व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. स्पर्धा यशस्वीतेसाठी हृदयनाथ मोरे, मिलिंद निकम, संजय पाटील आदींनी परिश्रम घेतले.

### पाडळसरे धरण जनआंदोलन समिती

**अमळनेर ।** पाडळसरे धरण जनआंदोलन समितीतर्फे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास समितीतर्फे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जनआंदोलन समितीचे प्रमुख सुभाष चौधरी, अमळनेर अर्बन बँकेचे संचालक रणजित शिंदे, नगरसेवक प्रताप साळी, सुनिल पाटील, देविदास देसले, नरेंद्र पाटील, सुनिल भोई, महेश पाटील, नारायण बडगुजर आदी उपस्थित होते. यावेळी जय भीम आणि बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. समितीच्या कार्यकर्त्यांसह भीमसैनिक याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### अमळनेरात उसळला भीमसागर



अमळनेर । भारतीय घटनेचे निर्माते विश्वरत्न परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांनी भीममय झाले होते. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ सकाळी ८ वाजता बुद्ध वंदना व भीम स्तुती घेऊन महामानवास विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी मंत्री तथा आ. अनिल पाटील, माजी आमदार डॉ.बी.एस.पाटील, माजी आमदार शिरीष चौधरी, लोकनित्क नगराध्यक्ष डॉ.परीक्षीत बाविस्कर, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, न.पा.मुख्याधिकारी गणेश शिंदे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्यासह अनेक शासकीय अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच माजी नगरसेवक नरेंद्र संदानशिव, महेश देशमुख, कैलास पाटील, नावेद शेख, दीपक चौगुले, सविता संदानशिव, नंदा संदानशिव, शोभा गढरे, देवेंद्र कांबळे आदी नगरसेवक उपस्थित होते. प्रवीण जैन, रणजीत शिंदे, प्रा.अशोक पवार, अशोक बिऱ्हाडे, अनिता संदानशिव, भारती कोळी, निवेदिता कापडणेकर, डी.ए.पाटील,मंगला सोनवणे, सुनील करंदीकर, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष मेजर बिऱ्हाडे, विजय संदानशिव यासह विविध क्षेत्रातील अनेक दिग्गज मंडळी उपस्थित होते.

## थोडक्यात

### पारोळ्यातील अतिक्रमणांवर प्रशासनाचा हातोडा



**पारोळा ।** येथील कासोदा रस्त्यालगतच्या दुय्यम निबंधक कार्यालयाच्या परिसरातील शासकीय भूखंडावर अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने ठेवण्यात आलेल्या लोखंडी टपऱ्यांच्या सांगाड्यांवर प्रशासनाने जेसीबीच्या सहाय्याने कारवाई केली. येथील तहसील कार्यालयानजीक सिटी सर्व्हे क्र. २४४ वर शासनाने तलाठी गृहनिर्माण संस्था निर्माण केली आहे. त्यात शासकीय जागेवर टपऱ्या टाकून अतिक्रमण केले असून वसाहतीत पालिकेचा खूला भूखंड देखील आहे. याच परिसरात दुय्यम निबंधक कार्यालय बांधण्यात आले आहे. हे कार्यालय अजून सुरु झाले नाही. तोवर तलाठी कॉलनीच्या आजूबाजूला सुमारे ३० ते ४० लोखंडी टपऱ्यांचे सांगाडे ठेवून ही जागा बळकावण्याचा प्रयत्न अतिक्रमणधारकांनी केला होता. याबाबत स्थानिक रहिवाशांनी देखील या अतिक्रमणांबाबत तक्रार केली होती. संबंधित टपऱ्या हटवाव्यात, अशी मागणी तहसीलदारांना निवेदनाद्वारे केली होती. त्याच्या प्रती पोलिस निरीक्षकांसह दुय्यम निबंधक व सार्वजनिक बांधकाम विभागाला देखील देण्यात आल्या होत्या. अतिक्रमण न निघाल्यास रहिवाशांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. प्रशासनाने वृत्त पत्रातील बातम्याची दखल घेत पोलिस बंदोबस्तात परिसरातील अतिक्रमणाच्या लोखंडी सांगाड्यांवर जेसीबी चालवून सर्व सांगाडे नष्ट केले. यावेळी तहसीलदार डॉ. उल्हास देवरे, पोलिस उपनिरीक्षक विजय भोंबे, दुय्यम निबंधक गणेश लोखंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता संजय पाटील तसेच पालिका कर्मचारी उपस्थित होते.

### चाळीसगावात २० रोजी तालुकास्तरीय लोकशाहीदिन

**चाळीसगाव ।** तालुक्यातील प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरावर लोकशाही दिन राबवण्याचे आदेश आहेत. त्याच अनुषंगाने तालुकास्तरीय लोकशाही दिन दि. २० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार महिन्याच्या प्रत्येक तिसऱ्या सोमवारी तालुकाच्या ठिकाणी तहसिल कार्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात यावे, असे आदेश आहेत. त्याअनुषंगाने महिन्याच्या प्रत्येक तिसऱ्या सोमवारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील सभागृहात लोकशाही दिन आयोजीत करण्यात येत असतो. सोमवारी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. तरी नागरिकांना प्रशासनातर्फे आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी या लोकशाही दिनाच्या कार्यक्रमात आपल्या समस्या आवश्यक त्या कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्जात स्वत: उपस्थित राहुन मांडव्यात.

# भुसावळ येथे भाजपातर्फे डॉ.आंबेडकरांना अभिवादन

## मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ अर्पण करून करण्यात आले अभिवादन

प्रतिनिधी । भुसावळ

**भारतीय संविधानाचे शिल्पकार, महान विचारवंत व सामाजिक समतेचे पुरस्कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भारतीय जनता पार्टी, भुसावळ शहराच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**



यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत समाजासाठी दिलेल्या त्यांच्या अमूल्य योगदानाचे स्मरण केले. तसेच 'जय भीम' व 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून प्रतिष्ठा महिला मंडळाच्या अध्यक्षा रजनी सावकारे, उपनगराध्यक्ष शैलजा नारखेडे, गटनेते युवराज लोणारी व मनोज बियाणी उपस्थित होते. पक्ष पदाधिकाऱ्यांमध्ये भाजपा उत्तर शहराध्यक्ष संदीप सुरवाडे, दक्षिण शहराध्यक्ष किरण कोलते, शहर सरचिटणीस पवन बुंदेले, सागर चौधरी, जयंत माहूरकर, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष संतोष ठोकळ व रवींद्र दाभाडे आदींचा समावेश होता. नगरसेवकांमध्ये गिरीश महाजन, राजेंद्र आवटे, निक्की बत्रा, विशाल नाटकर, शोभा रणधीर, सीमा नरवाडे, पूजा तायडे, अर्चना सातदिवे व सोनल महाजन उपस्थित होते. तसेच इतर मान्यवर व कार्यकर्त्यांमध्ये पुरुषोत्तम नारखेडे, विलास सातदिवे, बोधराज चौधरी, राजेंद्र नाटकर, कैलास चौधरी, अल्बर्ट तायडे, श्रेयस इंगळे, रुपेश देशमुख, नारायण रणधीर, गुड्डू अग्रवाल, राहुल तायडे, गौरव वाघ, धनराज बाविस्कर, अनिता आंबेकर, अलका शेळके, सविता मकासरे, लक्ष्मी मकासरे, शंकर शेळके, प्रशांत नरवाडे, प्रशांत पाटील, सुमित बऱ्हाटे, सुनिल धीवरे, कैलास शेलोडे, गोपी राजपूत, मनीष पाटील, सागर जाधव, प्रसिद्धी प्रमुख गोकुळ बाविस्कर, रहमान शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

# वरणगावात भीम जयंतीचा अभूतपूर्व उत्साह




प्रतिनिधी । वरणगाव

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वरणगाव शहरात मंगळवारी भव्य आणि उत्साहपूर्ण मिरवणुकांचे आयोजन करण्यात आले. शहरातील विविध भागांतून काढण्यात आलेल्या पाच मिरवणुकांमुळे संपूर्ण वरणगाव जय भीमच्या घोषणांनी दुमदुमून गेले. सकाळी १० वाजता रेल्वे स्टेशन परिसरातून ढोल-ताशा व डीजेच्या जल्लोषात मिरवणुकीस प्रारंभ झाला. उत्साही कार्यकर्ते, महिला, युवक आणि बालगोपाळ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

प्रत्येक ठिकाणी 'जय भीम'च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. गेल्या काही दिवसांपासून शहरात जयंतीची जोरदार तयारी सुरू होती. संपूर्ण शहर निळ्या झेंड्यांनी सजविण्यात आले होते. विद्युत रोषणाई आणि आकर्षक सुशोभिकरणामुळे शहराला उत्सवाचे स्वरुप प्राप्त झाले होते. आंबेडकर नगर येथील डॉ. आंबेडकर बाबासाहेब यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसर विशेष आकर्षण ठरला. मिरवणुकीदरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य प्रतिमा, भारतीय संविधानाची प्रतिकृती तसेच धम्मदीक्षेचे देखावे सादर करण्यात आले. या देखाव्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले व प्रेरणादायी वातावरण निर्माण केले. सिद्धेश्वर नगर, सम्राट नगर, संघ भारतीय संविधानाचे शिल्पकार नगर, वामन नगर, रामेश्वर पेठ आणि आंबेडकर नगर येथील नागरिक मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले. हजारोंच्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरल्याने संपूर्ण शहरात जनसागर उसळल्याचे चित्र दिसून आले. मिरवणूक रेल्वे स्टेशन, तिरंगा सर्कल, भोगावती नदी, गांधी चौक, मोठा माळीवाडा आणि मोठी होळी या प्रमुख मार्गाने काढण्यात आली. ठिकठिकाणी नागरिकांनी मिरवणुकीचे स्वागत करुन 'जय भीम'च्या घोषणा दिल्या. आंबेडकर नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विहारात बौद्धाचार्य विजय बोदडे यांच्या वंदनेने मिरवणुकीचा समारोप शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने झाला. या संपूर्ण कार्यक्रमासाठी डॉ. आंबेडकर उत्सव समितीचे अध्यक्ष विजय सोनवणे व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. पोलीस निरीक्षक अमितकुमार बागुल, उपनिरीक्षक मंगेश बेंडकोळी, इस्माईल शेख, जितेंद्र जैन तसेच इतर पोलीस, होमगार्ड कर्मचारी मोठ्या संख्येने तैनात होते.

# हातेडला डॉ.आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी । चोपडा

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, मानवमुक्तीचे महान पुरस्कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आदर्श गाव हातेड बुद्रुक येथे अभूतपूर्व उत्साह, एकात्मता आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले. गाव एकत्रित येत बाबासाहेबांच्या विचारांना मानवंदना दिली.**



कार्यक्रमात सरपंच प्रेरणा संदीप सोनवणे, मनोज सनेर ऊर्फ विक्की, डॉ.पाडुरंग वंजी सोनवणे , नंदुभाऊ गुलाब बाविस्कर मान्यवरांच्या प्रभावी भाषणांनी विशेष रंग भरला. आपल्या मनोगतात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा केवळ उल्लेखच नाही, तर त्यांच्या तत्त्वज्ञानाची आजच्या समाजासाठी असलेली अनिवार्यता अधोरेखित केली. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा संदेश प्रत्येकाच्या मनात नवचैतन्य निर्माण करणारा ठरला. समानता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा या प्रसंगी सर्वांना मिळाली. आदर्श गाव हातेड बुद्रुक येथे साजरी झालेली ही जयंती केवळ एक औपचारिकता नव्हती, तर ती विचारांची क्रांती, सामाजिक जाणीवेची जागृती आणि एकात्मतेचा उत्सव ठरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रकाश अशाच प्रकारे समाजाला दिशा देत राहो, हीच या कार्यक्रमातून व्यक्त झालेली सामूहिक भावना होती. कार्यक्रमासाठी प्रवीण सोनवणे, प्रभाकर सनेर , मनोज बाविस्कर , निंबा वाघ , रमेश सनेर, दत्तात्रय बाविस्कर , सुनील बाविस्कर , तुषार बाविस्कर , भूषण बाविस्कर, आहिरे परिवार बाविस्कर पिरवारातील सर्व सदस्य यांनी मेहनत घेतली.गावातील सर्व मोठ्या ग्रामस्थ उपस्थित होते.

# जिल्ह्यातील गो-तस्करी प्रकरणाची मंत्रालयाकडून दखल

## किरण माळी यांच्या निवेदनानंतर गृह व पशुसंवर्धन विभागाकडे प्रकरण वर्ग

प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यातील पाळधी येथे उघडकीस आलेल्या गो-तस्करी प्रकरणाची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली आहे. सामाजिक कार्यकर्ता किरण आनंदा माळी यांनी सादर केलेल्या निवेदनानंतर मुख्यमंत्री सचिवालयाने हे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी गृह विभाग तसेच पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाकडे वर्ग केले आहे.**

पाळधी येथे पोलिसांनी बुधवारी कारवाई करत गोवंश जनावरांची सुटका केली होती. या कारवाईचे सर्वत्र स्वागत होत असले, तरी अशा घटना वारंवार का घडतात? याबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा अंतर्गत गोवंश कत्तल व अवैध वाहतुकीवर बंदी असतानाही अशा प्रकारच्या घटना समोर येत असल्याने कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. किरण माळी यांनी आपल्या निवेदनात गो-तस्करी रोखण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष पथक स्थापन करणे, संवेदनशील भागात नियमित गस्त वाढवणे तसेच चेकपोस्टवर वाहनांची काटेकोर तपासणी करण्याची मागणी केली आहे.



मुख्यमंत्री सचिवालयाकडून संबंधित विभागांना आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. त्यामुळे या प्रकरणावर आता वरिष्ठ स्तरावर लक्ष ठेवले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. तथापि, मंत्रालयाकडून प्रकरण पुढे पाठविण्यात आले असले तरी जिल्हास्तरावर अद्याप ठोस प्रतिसाद किंवा अंमलबजावणीबाबत स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.

मंत्रालयाकडून दखल घेतल्यामुळे या लढ्याला बळ मिळाल्याचे सांगत किरण माळी यांनी स्थानिक प्रशासनावर टीका केली. प्रशासन बहुतेक वेळा घटना घडल्यानंतरच कारवाई करते. मात्र, घटना होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपायांची गरज आहे. मुख्यमंत्री कार्यालयाने दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी झाली का? याचा आम्ही माहिती अधिकारातून पाठपुरावा करणार आहोत, असा इशारा श्री. माळी यांनी दिला आहे.

# विक्रम ग्रंथालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील विक्रम ग्रंथालय व मोफत वाचनालयात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त छोटेखानी व्याख्यानाचे आयोजन करण्यात येऊन जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.**



कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस ग्रंथालयाचे सचिव महेश आहेराव, जेष्ठ संचालक ललित उपासनी तसेच नुकतेच पोलीस खात्यात नियुक्ती झालेले शिवदास पारधी यांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महेश आहेराव सर, यांनी आपल्या मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा सोप्या शब्दांत आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, बाबासाहेबांनी समाजातील वंचित, दुर्बल आणि शोषित घटकांना शिक्षण, समता आणि न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. भारतीय संविधानाची निर्मिती करून त्यांनी प्रत्येक नागरिकाला समान हक्क दिले. शिक्षणाला त्यांनी दिलेले महत्त्व, तसेच ङ्कशिका, संघटित व्हा आणि संघर्ष कराङ्क हा त्यांचा संदेश आजही समाजासाठी मार्गदर्शक आहे. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी बाबासाहेबांचे विचार आणि कार्य हे प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवदास भिका पारधी हे होते. याप्रसंगी ग्रंथालयाचे सर्व संचालक, वाचक तसेच अभ्यास करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेस कृतज्ञ वंदन करून अभिवादन केले. अतिशय शांत आणि शिस्तबद्ध कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ग्रंथपाल भगवान कुंभार यांनी केले.

# श्री संत शिरोमणी सेना महाराज जयंती साजरी

प्रतिनिधी । चोपडा

नाभिक समाजाचे आराध्य दैवत श्री संत शिरोमणी सेना महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष एम टी महाले व प्रमुख पाहुणे देविदास सोनवणे, सुभाष सैंदाणे, प्राध्यापक नंदलाल वाघ, तालुकाध्यक्ष हिरालाल सोनवणे यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी राजेंद्र ईसी शहर खजिनदार व शत्रुघ्न सोनवणे शहर सचिव, विलास निकम, प्रमोद सोनगिरे,सुनील सोनगिरे,प्रकाश क्षीरसागर , किशोर सैंदाणे व ज्येष्ठ सल्लागार अर्जुन निकम, सुदाम सोनवणे आदी उपस्थित होते.



यावेळी नंदलाल वाघ यांनी महाराजांविषयी मनोगत व्यक्त केले तर प्रकाश क्षीरसागर यांनी महाराजांविषयी अहिराणी शब्दात एक गीत लिहिलेले आहे ते पुढे रिलीज करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत व त्याबद्दल त्यांनी माहिती दिली व त्यासाठी लागणारा खर्चही समाजाने थोडी मदत करावी अशी त्यांनी मागणी केली. शहराध्यक्ष उमाकांत मधुकर निकम सूत्रसंचालन यांनी केले.

# पाचोरा तालुक्यातील ६ ऊसतोड मजुरांची प्रशासनाने केली सुटका!

## वेगवेगळ्या कामांना जुंपुन ठेवले जात होते; कामाचा मोबदला मात्र मिळेना

प्रतिनिधी । चोपडा

**ऊसतोडीच्या कामासाठी नाशिक जिल्ह्यात नेलेल्या परधाळे (ता. पाचोरा) येथील ६ मजुरांना अन्य कामे देत डांबून ठेवल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. मजुरीची रक्कम न देता या मजुरांवर उपासमारीची वेळ आली होती. जनसाहस संस्थेने प्रशासनाचा दरवाजा ठोठावला. त्यामुळे जळगाव आणि नाशिक जिल्हा प्रशासनास सूत्रे हलवित या मजुरांना सुखरुप घरी रवाना करण्यात यश आले आहे.**



परधाळे (ता.पाचोरा) येथील ६ मजुरांना ऊसतोडीच्या कामासाठी निफाड तालुक्यात नेण्यात आले होते. कित्येक दिवसांपासून मजुरांना निफाडसह अन्य गावांमध्ये ऊसतोड व अन्य गुऱ्हाळाच्या कामांसाठी जुंपण्यात आले. मोबदला मागितल्यावर मात्र धमकावण्यास सुरुवात करण्यात आली. कामगारांना नजरेखाली ठेवत त्या कामगारांची दुचाकी मालकाने स्वतःच्या ताब्यात ठेवली होती. त्यांच्याकडून मर्जी नसताना इच्छेविरुद्ध कामे जबरदस्तीने करून घेण्यात येत होती. या प्रवासात एकच मालकांकडे वेगवेगळ्या कामांसाठी जुंपले असताना कलाबाई अभिमन मोरे या मजूर महिलेने आपल्यावर होत असलेल्या अन्यायाविषयीची माहिती जनसाहस संस्थेच्या कामगार हेल्पलाईन क्र.१८००१२०११२११ ला कळवली. जनसाहस संस्थेने पुढाकार घेत जिल्हाधिकारी रोहन घुगे यांना याबाबत माहिती दिली. घुगे यांनी तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. नाशिक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या सहकार्याने महसूल विभाग, कामगार विभाग, पोलिस विभाग पुढील रेस्क्यू कार्यवाहीसाठी आदेश निर्गमित करण्यात आले. जनसाहस संस्थेचे डा.विरसेन काजळे, राज्य कामगार सुरक्षा समन्वयक रुबीना सय्यद, जळगाव जिल्हा समन्वयक निलेश शिंदे, जळगांव क्षेत्र अधिकारी सोनम बिऱ्हाडे, कपिल बोरसे, विक्रम ढेरे जनसाहस टीम व निफाड तालुका तहसीलदार विशाल नाईकवाडे ,/ यांनी बंधपत्रित कामगार कायद्यानुसार कारवाई करण्याचे आणि बचाव पथक तयार करून कामगारांना सुटका करण्यासाठी रेस्क्यू प्रक्रिया करण्यात आली. त्या कामगारांना जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये पंचनामा व जबाब घेऊन सुरक्षित व सुखरूपपणे त्यांना त्याच्या गावी पोहचवण्यात आले कामगारांच्या पुनर्वसन व शासकीय योजनेबद्दल चर्चा करण्यात आली.

**या मजुरांची झाली सुटका**

परधाळे (ता.पाचोरा) येथील गोकुळ गिरधर पवार, नीता गोकुळ पवार, आरधी गोकुळ पवार, रुपाली बारकू वाघ, श्रावण बारकू वाघ, जयश्री बारकू वाघ हे मजूर सुखरुपपणे घरी परतले आहेत.

# पंकज विद्यालयात डॉ.आंबेडकरांना अभिवादन



प्रतिनिधी । चोपडा

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.**

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व शिक्षक मनोगतात विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक यु.आर. गुजर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तत्कालीन समाजातील विषमता, चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिक काळाराम मंदिरातील दलितांना मंदिर प्रवेश या घटनांचा इतिहास उलगडून सांगितला.

तद्नंतर विद्यालयाचे शिक्षक बी.एम.तायडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर आधारित गीत सादर केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आर. के. माने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीच्या कार्याविषयी सविस्तर असं मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.